# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक २४ जून, २०२१

## प्रसिध्दीपत्रक

१. उल्हासनगर महानगरपालिकेकडून मागील एका महिन्यात धोकादायक/अतिधोकादायक इमारतींच्या, नियमीत करण्याच्या अनुषंगाने करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनाचा तपशिल खालीलप्रमाणे.

**अ.** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकामाचे Structural Audit करण्यासाठी महानगरपालिकामार्फत १५ Structural Auditor यांचे पॅनल नियुक्ती करण्यात आलेले आहे. त्यामध्ये नामांकित व इतर पात्र Structural Auditor यांचा समावेश आहे. सदर पॅनलमधील अथियंता कडून किंवा इतर अन्य Qualified Structural Engineer कडून महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक त्यांच्या इमारतीचे Structural Audit करुन घेऊ शकतात.

**ब.** महानगरपालिकेने धोकादायक इमारती म्हणून घोषित केलेल्या जवळपास ११६ इमारतींचे Structural Audit मा. महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहून महानगरपालिकामार्फत करण्यात येऊन त्यासाठी आलेल्या खर्चाची रक्कम संबधित इमारतीच्या मालमत्ता कराच्या रक्कमेमध्ये समाविष्ट करुन वसुल करण्यात येईल.

महानगरपालिका क्षेत्रातील उपरोक्त इमारती वगळता अन्य इमारतींना दिलेल्या नोटीशिच्या अनुषंगाने संबंधितांनी त्यांची बाजू लिखित स्वरूपात महानगरपालिकेकडे सादर केल्यास प्रकरण निहाय तपासणी करुन विहीत नियमानुसार त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल.

**क.** धोकादायक इमारतीतील विस्थापित नागरीकासाठी तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून शाळा, समाज मंदिर येथे व्यवस्था करण्यात येत आहे. तसेच टाटा आमंत्रा इमारत भिंवडी येथे ५०० कुंटुबियांसाठी तात्पुरत्या सदनिका विस्थापित नागरीकांसाठी तात्पुरत्या उपलब्ध होण्यासाठी शासनाची मंजुरी देण्याबाबत विनंती केलेली आहे. सदर प्रकरण अंतीम टप्प्यात निर्णयाधिन असून लवकरच निर्णय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लोकांसाठी तात्पुरती सोय होईल.

त्याच बरोबर शहरातील/शहराच्या बाहेरील देखिल सदनिका/ पर्याय शेधणे सुरू आहे.

**ड.** निवारा केंद्रासाठी Transit Camp तसेच बाधीत लोकांना वास्तव्यासाठी महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने मंजुर विकास आराखडयाप्रमाणे (DP Plan) आरक्षित

जागेचे सिमांकन करुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याचबरोबर सार्वजनिक बांधकाम विभागाने उल्हासनगर महानगरपालिकेचे सल्लागार यांना आराखडा तयार करणेसाठी निर्देशीत केलेले आहे. सदर निवारा केंद्राच्या बांधकामासाठी आवश्यक निधीची मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या सुधारीत अंदाजपत्रकात निधीची तरतुद करण्यात येणार आहे.

**इ.** अनधिकृत बांधकामे नियमाकुल (Regularisation) करणेबाबत नगररचना विभागाकडे जवळपास ४० प्रकरणामध्ये संबंधितांनी पुर्णपणे नियमाधीन करण्याचे शुल्क भरणा केले असून सदर प्रकरणामध्ये उप विभागीय अधिकारी, उल्हासनगर, यांचेकडून पुढील कार्यवाही करुन साधारणपणे १० दिवसात डी फॉर्म (D Form) देण्यात येणार आहेत.

**ई.** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे नियमाकुल करण्याच्या कायदयामध्ये सुधारणा करणेकामी सदर कायदयामधील अंमलबजावणीमध्ये येत असलेल्या विविध अडचणीबाबत मागील दोन महिन्यामध्ये शासन स्तरावर विविध बैठकामध्ये प्राप्त निर्देशानुसार सविस्तर प्रस्ताव महानगरपालिकामार्फत सादर करण्यात आलेला आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील एक ते दोन आठवडयामध्ये शासन स्तरावर बैठक आयोजीत होऊन उचित निर्णय होण्याची शक्यता आहे.

**२.** तरी वरील विषयाबाबत दिनांक २३.०६.२०२१ रोजी (संदर्भ क्र. ३) मा. महापौर, व सर्व पक्षिय पदाधिकारी उल्हासनगर महानगरपालिका, यांच्या बैठकीमध्ये देखील उपरोक्त सर्व मुदयांबाबत सकारात्मक चर्चा झालेली असून त्यास आपण समंती दिलेली आहे. त्याच बरोबर दि. २४/०६/२०२१ रोजी मा. पालकमंत्री यांच्या कडे झालेल्या बैठकीमध्ये सदर विषयावर सकारात्मक चर्चा झालेली आहे.

**३.** उपरोक्त सर्व वस्तुस्थिती विचारात घेता आपल्या निदर्शनास आणण्यात येते की, सदर विषयाबाबत महानगरपालिका गंभीर असून, उल्हासनगर शहरातील नागरीकांच्या सुरक्षेबाबत कटीबध्द आहे व त्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करित आहे.

तरी सर्व नागरीकांना विनंती आहे की, महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे.

24/6/2021

(डॉ. राजा दयानिधी भा.प्र.से.)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका